वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन" संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्यूएलपी-०३.१८/प्र.क्र १०८/फ-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च, २०१८

वाचावे :-

१. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक :- डब्ल्युएलपी ०२.१७/प्र.क्र.५५/फ-१ दिनांक- ०२.०२.२०१७.
२. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक :- डब्ल्युएलपी ०२.१७/प्र.क्र.५५/फ-१ दिनांक- २५.१०.२०१७.
३. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्रमांक :- डब्ल्युएलपी ०२.१७/प्र.क्र.५५/फ-१ दिनांक- २२.०१.२०१८.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र कक्ष-३/योजनेतर/ प्र.क्र. ४९/१७-१८/ २१९८, दिनांक :- २६.०२.२०१८.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क दिनांक :- ०५.०३.२०१८.

शासन निर्णय :-

"वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन" संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांना सन २०१७-२०१८ मध्ये संदर्भ क्रमांक १, २ व ३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०३.२०१७ ते दिनांक २८.०२.२०१८ पर्यत चालू ठेवण्यासाठी शासनाची मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. आता संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी "वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन" संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी सन २०१८-२०१९ मध्ये दिनांक ०१.०३.२०१८ ते २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

२. प्रशासकीय विभागाच्या आकृतिबंधातील समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु त्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत.

३. संदर्भ क्रमांक ५ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये "वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन" संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांना सन २०१८-१९ मध्ये दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे..

४. "वन्यप्राणी रक्षण व निसर्ग संर्वधन" संरक्षित क्षेत्राचे (Protected Area) संरक्षणाकरिता वनरक्षकांची १०० अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर), ०२ पर्यावरणात्मक वनीकरण व वन्यजीवन, ११० वन्यजीवन, ११० (एक) निसर्ग संवर्धन व वन्यपशू संरक्षण (२४०६ ०७६६) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. असंक - १००४ / प्र.क्र.१२ /(भाग-२) / २००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०४.१०.२००४ व क्रमांक:- पदनि २०१६/प्र.क्र. ८/१६/विसु-१, दिनांक ११.०२.२०१६, क्रमांक:- पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दिनांक २१.०९.२०१६ व क्रमांक :- पदनि २०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क. दि. ०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१५३९३३७०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Deshbhratar

Digitally signed by Swapnil Deshbhratar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9add558653210cf44615291102f1bf143783e8403be64c06c7928e692d77c386, cn=Swapnil Deshbhratar
Date: 2018.03.28 15:40:43 +05'30'

(स्वप्निल देशभ्रतार)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), मंबई/नागपूर /नाशिक.
४) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई - ३२,
५) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

*****

शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी ०३.१८/प्र.क्र.१०८/फ-१, दिनांक:- २७ मार्च, २०१८ सोबतचे विवरणपत्र

(दिनांक :- .०१.०३.२०१८ ते दिनांक :- ३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली वनरक्षक संवर्गातील पदे)

वन्यजीव वृत्त	**वन्यजीव विभाग**	**राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याचे नाव**	**पद संख्या**
१	२	३	४
नागपूर	पेंच नागपूर	पेंच राष्ट्रीय उद्यान	**५**
	गोंदिया	नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान	**८**
		नागझिरा अभयारण्य	**५**
	पांढरकवडा	पैनगंगा अभयारण्य	**११**
मुंबई	नाशिक	यावल अभयारण्य	**६**
		संरक्षण पथक (यावल)	**२**
		तपासणी नाके (यावल)	**६**
	औरंगाबाद	गौताळा औट्रमघाट अभयारण्य	**६**
	ठाणे	तानसा अभयारण्य	**१८**
	कोल्हापूर	चांदोली राष्ट्रीय उद्यान व सागरेश्वर अभयारण्य	**१३**
		राधानगरी अभयारण्य	**४**
		कोयना अभयारण्य	**७**
	पुणे	भिमाशंकर अभयारण्य	**९**
एकूण पदे			**१००**

****